# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 18/08/2021 (बुधवार)

(सायंकाळ)

---

### अवैधरीत्या शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीला अटक
### स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीणची कारवाई

दिनांक 17/08/2021 रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक, पो.स्टे. कन्हान हद्दीत पेट्रोलिंग करीत असतांना त्यांना गुप्त बातमीदारा कडुन माहिती मिळाल्यावरून त्यांनी आरोपी नामे– राहुल नंदनलाल प्रसाद, वय 20 वर्ष, रा. निरंकारी भवन समोर याचे घराची झडती घेतली असता घरातील सोप्यामध्ये होल करून लपवुन ठेवलेली लोखंडी हॅन्डमेड देसी कटटा कि. 10,000/–रू. चा अग्नीशस्त्र मिळुन आला. सदर हत्यारा बाबत आरोपीला परवाना विचारला असता त्याच्या जवळ कोणत्याही प्रकारचे कागदपत्रे मिळुन आले नाही.

सदर प्रकरणी सरकार तर्फे सहायक पोलिस निरीक्षक श्री अनिल राउत, स्थानिक गुन्हे शाखा यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम 3, 25 भारतीय हत्यार कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. नमुद आरोपीला अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक श्री. अंबरते 9921923588 हे करीत आहेत.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक श्री राकेश ओला, अपर पोलीस अधीक्षक श्री राहुल माकणीकर पोलीस निरीक्षक श्री अनिल जिट्टावार स्था.गु.शा. यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि श्री जितेंद्र वैरागडे, पोउपनी श्री अनिल राउत, पोहवा विनोद काळे, नापोशि शैलेश यादव, पोशि भगत, प्रणय बनाफर, विरेंद्र नरड, सत्यशिल कोठारे, चापोहवा भाउराव खंडाते यांनी पार पाडली.



## अकस्मात मृत्यू

पो.स्टे. कोंढाळी :– अंतर्गत 30 कि. मी. अंतरावरील मौजा गौराळा येथे दिनांक 16/08/2021 चे 20.30 वा. पुर्वी ज्ञानेश्वर झोलबाजी बोरजवाडे (मृतक), वय 57 वर्ष, रा. गौराळा, ता हिंगणा जि. नागपूर याने आपल्या गौराळा येथील शेतात ईलेक्ट्रीक पोलला लागलेला लाईट सुरू करण्याकारीता मिटर पेटी उघडली असता त्याला पेटीचा करंट लागल्याने तेथेच खाली पडुन मरण पावला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– राहुल ज्ञानेश्वर बोरजवाडे, वय 27 वर्ष, रा. गौराळा ता. हिंगणा जि. नागपूर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कोंढाळी येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस शिपाई इमरान 8329587778 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर